संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

जनसंपर्क विभाग

# विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिवस कार्यक्रमाचे उद्‌घाटन २८ फेब्रुवारीला

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आणि नॅशनल कॉऊन्सिल फॉर सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी कम्युनिकेशन (एन.सी.एस.टी.सी.), भारत सरकार व राजीव गांधी सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी कमिशन, महाराष्ट्र शासन यांचे संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विज्ञान दिवस कार्यक्रमाचे उद्‌घाटन दि. २८ फेब्रुवारी, २०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता विद्यापीठ दृकश्राव्य सभागृहात आयोजित करण्यात आले असून 'कम्युनिकेटींग सायन्स फॉर ऑल' ही थीम यावर्षीसाठी ठेवण्यात आली आहे.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्लीचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांचे शुभहस्ते होणार असून अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर भूषवतील. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.

समारोपीय व बक्षीस वितरण समारंभ दि. १२ मार्च, २०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता विद्यापीठ दृकश्राव्य सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेचे संचालक डॉ.एस.जी. गुप्ता उपस्थित राहतील. कार्यक्रमाला नवसंशोधन, नवोपक्रम व साहचार्य मंडळाचे संचालक डॉ.डी.टी. इंगोले यांची उपस्थिती लाभणार आहे. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ पार पडणार आहे.

तरी राष्ट्रीय विज्ञान दिवस कार्यक्रमाला जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ. हेमंत देशमुख व कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. नितीन फिरके यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २६/०२/२०१९.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी